# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.06.2025** **वार- शुक्रवार**

---

**राज्यपाल**

विद्यार्थ्यांनी निश्चित उद्दीष्ट समोर ठेवून त्याला कठोर परिश्रम, एकाग्रतेची जोड दिल्यास आणि निराश न होता प्रयत्नरत राहिल्यास त्यांना भविष्यातील वाटचालीत निश्चितपणे यश संपादन करता येईल, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज पुण्यात केलं. सिम्बायोसिस विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी पदवीप्रदान समारंभात ते बोलत होते.

विद्यापीठाचे कुलपती. डॉ. एस. बी. मुजुमदार, प्र. कुलगुरू डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. रामकृष्णन रमन, आणि अन्य मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमात राज्यपालांच्या हस्ते २२ देशातल्या ८२ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

**माधुरी मिसाळ**

पुणे महापालिकेत नव्यानं समाविष्ट झालेल्या गावांसह महापालिकेच्या हद्दीत आधीपासून निवास करीत असलेल्या सर्व नागरिकांना समान न्याय मिळेल, अशी मिळकत कर आकारणीची रचना केली जाईल, असं आश्वासन नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिलं आहे. पुणे महानगरपालिकेच्या विविध

प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी मिसाळ यांनी आज महापालिका प्रशासनाबरोबर बैठक घेतली. या बैठकीनंतर त्या पत्रकारांशी बोलत होत्या. महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. बैठकीला उपस्थित होते.

सर्वांना समान न्याय मिळेल अशी कर रचना करणारा सविस्तर प्रस्ताव पुणे महापालिकेनं राज्य शासनाकडे पाठवावा त्याला मंजुरी देण्यात येईल असं मिसाळ यांनी सांगितलं.

**<u>मिळकत करसवलत मागणी</u>**

स्वत:च्या नावावर असलेल्या घरात राहणाऱ्या नागरिकांनी मिळकतकरातल्या ४० टक्के सवलतीसाठी 'पीटी-३' अर्ज भरुन दिल्यानंतरही महापालिकेची करसवलत त्यांना मिळालेली नाही. त्यामुळे सवलतीच्या दरात पुणेकरांना मिळकतकर भरता यावा, यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ द्यावी, अशी मागणी आपला परिसर संस्थेचे उज्वल केसकर, प्रशांत बधे, सुहास कुलकर्णी यांनी केली आहे. याबाबतचं निवेदन त्यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना दिलं आहे.

**<u>शेतकरी मदत</u>**

मे महिन्यात झालेल्या अवेळी पाऊस, गारपिटीमुळे पुणे जिल्ह्यात 33 टक्क्यांपेक्षा जास्त म्हणजे सुमारे 16 हजार 61 हेक्टर क्षेत्रावरील शेतपिकं, फळपिकांचं नुकसान झालं आहे. तसंच, शेतजमिनींचंही अतिपावसामुळे नुकसान झालं आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एकंदर 44 कोटी 50 लाख 58 हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव जिल्हा कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी जिल्ह्याधिकाऱ्यांकडे सादर केला आहे. 50 हजार 715 शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी लागणार असून, दौंड, बारामती, इंदापूर, खेड आणि जुन्नर तालुक्यांत पिकांचं आणि जमिनीचं सर्वाधिक नुकसान झालं आहे.

**<u>बनावट विमा</u>**

राज्य सरकारच्या सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी बनावट विमा घेतल्याचं आढळून आल्यास संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्यात येईल असा इशारा पुणे कृषी आयुक्तालयानं दिला आहे. तसंच त्या खातेदाराचा आधार क्रमांक पुढील पाच वर्षाकरता काळ्या यादीत टाकला जाईल आणि त्याला किमान पाच वर्ष शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ दिला जाणार नाही असं कृषी आयुक्तालयानं कळवलं आहे. या विमा योजनेत सहभागासाठी अंतिम मुदत 31 जुलैपर्यंत आहे.

**<u>फर्ग्युसन नवीन अभ्यासक्रम</u>**

फर्ग्युसन महाविद्यालयात योगशिक्षकांच्या प्रशिक्षणाशी संबंधित नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार असल्याची माहिती प्राचार्य डॉक्टर श्याम मुडे यांनी दिली आहे. हा अभ्यासक्रम पदव्युत्तर पदविका स्वरूपाचा असून योगशिक्षक होण्यासाठी आवश्यक सर्व घटकांचं सखोल शिक्षण या अभ्यासक्रमाच्या माध्यमामधून देण्यात येणार आहे. एक वर्षाचा हा अभ्यासक्रम, आठवड्यातील तीन दिवस संध्याकाळी पाच ते आठ या वेळेत महाविद्यालय प्रांगणात चालवण्यात येईल.

**<u>दृष्टीहीन कार रॅली</u>**

राउंड टेबल इंडिया या संस्थेतर्फे पुण्यात दृष्टीहिनांसाठी 'बियाँड साईट', ही आगळीवेगळी कार रॅली आयोजित करण्यात आली आहे. येत्या रविवारी सकाळी १० वाजता द फर्न क्लब, अमनोरा पार्क, पुणे इथं ही कार रॅली होणार आहे.

या रॅलीमध्ये ५० कारचालक सहभागी होणार आहेत. यामध्ये दृष्टिहीन व्यक्ती स्मार्टफोनवरून मिळणाऱ्या सूचना ऐकून कार चालवणाऱ्या दृष्टिक्षम व्यक्तीला मार्ग दाखवणार आहे. दृष्टिहीन व्यक्तींचं दिशा ज्ञान, स्थानिक समज आणि संवाद कौशल्यं यांचा प्रत्यय दर्शवणारी ही कार रॅली असेल.

**<u>मॅरेथॉन</u>**

वेस्टर्न घाट्स रनिंग फाउंडेशनच्या वतीनं सिंहगड एपिक ट्रेल या आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. उद्या पहाटे सिंहगड पायथ्यापासून या स्पर्धेला सुरुवात होईल.यावर्षी जगभरातल्यान ८ देशांसह, भारतातल्या २४ राज्यातले धावपटू स्पर्धेत सहभागी झाले आहेत. ११, २१, ३० आणि ४२ किलोमीटर अशा वेगवेगळ्या अंतरासाठी स्पर्धा होणार आहे.

**क्रीडा विजेतेपद करंडक**

खेलो इंडिया युवा स्पर्धे पाठोपाठ राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतही राज्याला सर्वसाधारण विजेतेपदकाचा करंडक मिळाला आहे. आज पुण्यात शिवछत्रपती क्रीडा संकुलात झालेल्या कार्यक्रमात विजेतेपदकाचा हा करंडक क्रीडा आणि युवक कल्याण विभागाच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. या स्पर्धेत १९७ सुवर्ण, १५९ रौप्य, १७४ कांस्य अशी एकंदर ५३० पदकांची लयलूट करीत महाराष्ट्रानं अव्वल स्थान पटकावलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल २९ तर किमान २३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्या आकाश अंशतः ढगाळ राहील आणि अधून मधून पावसाच्या हलक्या सरी पडतील असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता. ताज्या पुणे वृत्तांतमधे. नमस्कार.**